**सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांऐवजी सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन शुद्धीपत्रक क्र.:- सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.

दि.०५ सप्टेंबर, २०२५

**संदर्भ :-**

१. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२, दि.०१ सप्टेंबर, २०१२

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे पत्र क्र.बार्टी/सीव्हीसी विभाग/कार्या-१४/२०२५-२६/५९५०, दि.०४ सप्टेंबर, २०२५.

४. शासन निर्णय क्र.सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दि.०४ सप्टेंबर, २०२५.

५. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.तंशिप्र-१०२५/प्र.क्र.१४/जा.वै.प्र./मुदतवाढ/२८३३, दि.०५ सप्टेंबर, २०२५.

६. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे पत्र क्र.बार्टी/सीव्हीसी विभाग/कार्या-१४/२०२५-२६/५९६७, दि.०५ सप्टेंबर, २०२५.

**शासन शुद्धीपत्रक: -**

संदर्भ क्र.४ अन्वये राज्यात सुरु असलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी विनंती केल्यानुसार संदर्भ क्र.४ मधील "…..अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदत देण्यात येत आहे" ऐवजी "…..अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे" असे वाचावे.

(सतीश खैरमोडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री यांचे सचिव, उप मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
११. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
१२. मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
१३. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
१४. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१५. अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१६. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. विभागीय आयुक्त, महसूल विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग).
१९. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२०. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
२१. जिल्हाधिकारी (सर्व).
२२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२३. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)
२४. सह सचिव/ उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. निवड नस्ती/मावक.